सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३४३ | शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १,५१,५००
२२ सोने ९१.६०% : ₹ १,४०,५००
१८ सोने ७५.००% : ₹ १,१६,५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,३८०/-
भाव प्रती १० ग्राम




# मातीच्या गणपतीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## जयनिल फाउंडेशनतर्फे ६ सप्टेंबरला तालुकास्तरीय कार्यशाळा व स्पर्धेचे आयोजन



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी जयनिल फाउंडेशन, अमळनेरतर्फे ‘मातीच्या गणपती पर्यावरणाची खरी भक्ती’ या संकल्पनेवर आधारित तालुकास्तरीय मातीच्या गणपती कार्यशाळा व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत अमळनेर येथील मराठा मंगल कार्यालयात होणार आहे. पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कला विद्यार्थ्यांसह नागरिकांना शिकता यावी आणि प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीऐवजी मातीच्या गणपतीला प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

स्पर्धेसाठी बाल गट (इयत्ता १ ली ते ७ वी) आणि खुला गट (वयाची अट नाही) असे दोन गट करण्यात आले आहेत. दोन्ही गटांमध्ये प्रथम क्रमांकासाठी ३ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १ हजार रुपये अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला व प्रशिक्षणार्थीला प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे.

पर्यावरणाचे संरक्षण आणि गणेशोत्सवातील पर्यावरणपूरकतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जयनिल फाउंडेशनचे अध्यक्ष गौतम जयश्री अनिल पाटील आणि उपाध्यक्ष वरुण राजश्री राजेश पाटील यांनी केले आहे.

# गोकुळाष्टमीनिमित्त गोशाळेत गोसेवा

## गोविंद अग्रवाल व गार्डन ग्रुपचा स्तुत्य उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त शहरातील पळासदडे रोडवरील श्रीमती भानुबेन बाबूलाल शाह गोशाळेत गुरुवारी (४ सप्टेंबर) गोसेवा उपक्रम उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. श्री छत्रपती शिवाजी महाराज गार्डन ग्रुप, अमळनेर आणि मोहन कृषी उद्योगाचे संचालक तथा उद्योजक गोविंद अग्रवाल यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी १० वाजता या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते गोमातेचे पूजन व आरतीने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवर व भाविकांच्या हस्ते गोशाळेतील गोमातांना ओला चणा, ओले मूग, गूळ तसेच हिरवी कुट्टी यांचे खाद्य वाटप करण्यात आले. यावेळी गोसेवेमुळे गोशाळेच्या परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भगवान श्रीकृष्णांना गोमाता प्रिय असल्याने जन्माष्टमीनिमित्त गोसेवेचा उपक्रम राबविण्यात आला. गोपालन व गोसेवेचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आणि गोसेवेला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.



*अमळनेर येथील पळासदडे रोडवरील श्रीमती भानूबेन बाबुलाल शाह गोशाळेत गोकुळ आष्टमीनिमित्त गोमातेचे पूजन व आरती करताना मान्यवर.*

यावेळी गोशाळेचे संचालक चेतन शाह व सौ. मीना शाह या दाम्पत्याचा अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या निरपेक्ष व सेवाभावी कार्याबद्दल गार्डन ग्रुपतर्फे विशेष सत्कार करण्यात आला. तसेच कार्यक्रमात उपस्थित अनेक मान्यवरांनी गोशाळेसाठी उदार मनाने देणगी दिली. भाविकांसाठी फलाहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती. .दरम्यान, हरियाणा राज्यातील यमुनानगर येथे कर्तव्य बजावताना वीरमरण आलेले कोळपिंप्री येथील जवान रोहित काटे यांना यावेळी उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. देशसेवेसाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या जवान काटे यांच्या शौर्याला उपस्थितांनी अभिवादन केले.

या उपक्रमास महिला, पुरुष, व्यापारी बांधव, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच गार्डन ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोसेवा आणि सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या उपक्रमाबद्दल उद्योजक गोविंद अग्रवाल व श्री छत्रपती शिवाजी महाराज गार्डन ग्रुपचे सर्वत्र कौतुक होत आहे.








# रवि ज्वेलर्सची ग्राहकांना ‘कृष्ण साज’ची भेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त अमळनेर येथील रवि ज्वेलर्सतर्फे ग्राहकांसाठी अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्वेलर्समध्ये येणाऱ्या ग्राहकांना भगवान श्रीकृष्णाच्या बालस्वरूपाची आठवण करून देणारा आकर्षक ‘कृष्ण साज’ भेट म्हणून देण्यात आला.

सण-उत्सवाच्या आनंदात ग्राहकांनाही सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. श्रीकृष्णाच्या प्रेम, आनंद आणि सकारात्मकतेचा संदेश ग्राहकांपर्यंत पोहोचावा, या भावनेतून ‘कृष्ण साज’ची संकल्पना साकारण्यात आली.

या उपक्रमाला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दागिन्यांच्या खरेदीसोबतच सणांच्या निमित्ताने ग्राहकांशी भावनिक नाते जोडण्याचा रवि ज्वेलर्सचा हा प्रयत्न लक्षवेधी ठरला.

रवि ज्वेलर्सतर्फे दरवर्षी विविध सणांच्या निमित्ताने ग्राहकांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. ‘तुमच्या प्रत्येक क्षणासाठी, आमचा खास दागिना’ या भावनेतून ग्राहकांच्या आनंदात सहभागी होण्याचा प्रयत्न असल्याचे ज्वेलर्सच्या वतीने सांगण्यात आले.



## संपादकीय

# भारताच्या सेमीकंडक्टर क्रांतीचा नवा अध्याय

भारतातील सेमीकंडक्टर (चिप) उद्योग सध्या एका अत्यंत महत्त्वाच्या संक्रमण काळात आहे. सध्याच्या घडीला भारत १०० टक्के आयातीवर अवलंबून असला, तरी जागतिक पातळीवर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचं केंद्र बनण्याच्या दिशेनं भारत वेगानं पावलं टाकतोय. भारत जगात दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा स्मार्टफोन उत्पादक देश आहे. इलेक्ट्रिक वाहने आणि स्मार्ट वाहनांची मागणी वाढल्यानं चिप्सचा वापर मोठ्या प्रमाणात होतोय. एआयचा वाढता वापर, देशांतर्गत डेटा सेंटर्सची उभारणी, ५जी नेटवर्कचा विस्तार आणि आगामी ६जी संशोधनामुळे सेमीकंडक्टरची मागणी वाढलीय. आधुनिक जगात सेमीकंडक्टर चिप ही केवळ इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचा ब्रेन अर्थात मेंदू राहिलेली नसून ती कोणत्याही देशाच्या आर्थिक आणि लष्करी सुरक्षेचा मुख्य कणा बनली आहे. स्मार्टफोन, ऑटोमोबाईल, डेटा सेंटर्स, वैद्यकीय उपकरणे, संरक्षण यंत्रणा आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) च्या प्रचंड विस्ताराच्या या युगात चिप्सची मागणी जगभरात अभूतपूर्व वेगानं वाढतेय. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारनं देशांतर्गत सेमीकंडक्टर डिझाइन आणि मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टम मजबूत करण्यासाठी १.२७ लाख कोटी रुपयांच्या भरीव खर्चासह 'सेमीकॉन २.०' ही योजना अधिकृतपणे अधिसूचित केलीय. भारताला चिप मॅन्युफॅक्चरिंग आणि डिझाइनमध्ये स्वावलंबी बनवण्यासाठी ही योजना काम करेल.

केंद्रीय मंत्रिमंडळानं या धोरणाला जुलै २०२६ मध्ये मंजुरी दिली होती आणि आता त्याची सविस्तर नियमावली जारी करून अंमलबजावणीला सुरुवात झालीय. जागतिक पातळीवर सेमीकंडक्टर पुरवठा साखळीतील वाढता ताण आणि चीन, तायवान, दक्षिण कोरिया, अमेरिका आदी ठराविक देशावरील अवलंबित्व कमी करण्याच्या रणनीतीचा भाग म्हणून भारतानं हे महत्त्वाचं पाऊल उचललंय. येत्या काही वर्षांत जगातील एकूण सेमीकंडक्टर उत्पादनाच्या जवळपास १० टक्के उत्पादन भारतातून करण्याचं लक्ष्य ठेवण्यात आलंय. 'सेमीकॉन २.०' अंतर्गत संपूर्ण उद्योगाचा एकात्मिक विकास करण्यासाठी योजनेची ६ प्रमुख विभागांमध्ये विभागणी करण्यात आलीय. यामध्ये चिप डिझाइनिंगसाठी एसओसी, आयपी कोर, राष्ट्रीय सुरक्षेसाठी लागणाऱ्या चिप्स व भारतीय स्टार्टअप्सना प्रोत्साहन, सिलिकॉन सेमीकंडक्टर वेफर फॅब उत्पादनासाठी फॅब्रिकेशन युनिट्स, कंपाउंड व विशेष फॅब, डिस्प्ले फॅब, असेम्बली, ॲडव्हान्स चाचणी आणि पॅकेजिंग युनिट्स, कच्चा माल पुरवठा आणि आवश्यक मशिनरी उत्पादनाचे युनिट्स, ॲडव्हान्स रिसर्च प्रोजेक्ट्स आणि मानवी संसाधन प्रशिक्षण या घटकांचा समावेश आहे. सेमीकॉन २.० योजनेत सरकारनं सर्वाधिक भर चिप डिझाइनिंगवर दिलाय. भारतामध्ये आधीच जगातील २० टयांहून अधिक सेमीकंडक्टर डिझाइन इंजिनिअर्स कार्यरत आहेत, परंतु बौद्धिक संपदा अधिकार (आयपी राइट्स) परदेशी कंपन्यांकडे असतात. हे चित्र बदलण्यासाठी भारतानं देशाची सुरक्षा आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असणाऱ्या चिप्स, सिस्टम–ऑन–चिप आणि बौद्धिक संपदा विकसित करणाऱ्या भारतीय मालकीच्या डिझाइन कंपन्यांना प्रोत्साहन देण्याचं ठरवलंय. लहान उद्योग आणि नवीन स्टार्टअप्सना प्रॉडक्ट डिझाइनसाठी १५ कोटी रुपयांपर्यंत किंवा एकूण खर्चाच्या ५० टयांपर्यंत अनुदान दिलं जाईल. मोठ्या प्रकल्पांसाठी सरकार थेट इक्विटी खरेदी करून गुंतवणूक करेल.

चिप उत्पादनाचे कारखाने ज्यांना फॅब म्हटलं जातं ते अत्यंत खर्चिक आणि उच्च तंत्रज्ञानावर आधारित असतात. त्यासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक, २४ तास वीज आणि कोट्यवधी लिटर अति–शुद्ध पाण्याचा पुरवठा आवश्यक असतो. सिलिकॉन सेमीकंडक्टर वेफर फॅबसाठी किमान २० हजार कोटींची भांडवली गुंतवणूक आणि गेल्या ३ वर्षांत किमान ७,५०० कोटींचा वार्षिक टर्नओव्हर असणं आवश्यक ठेवलंय. केंद्र सरकार या प्रकल्पांना ४० टक्के आर्थिक मदत देईल. राज्य सरकारच्या विविध सवलती मिळून हे आर्थिक पाठबळ ६० टयांपर्यंत पोहोचते. कंपाउंड सेमीकंडक्टर आणि फोटोनिक्स फॅबसाठी ३५ टक्के, डिस्प्ले फॅबसाठी ३५ टक्के, तर प्रगत पॅकेजिंगसाठी ३५ टक्के आणि पारंपरिक पॅकेजिंगसाठी २५ टक्के आर्थिक मदत मिळेल. सध्या भारतामध्ये ३ सेमीकंडक्टर/चिप उत्पादन आणि चाचणी प्रकल्प कार्यरत असून त्यातून व्यावसायिक उत्पादन सुरू झालंय. याशिवाय गुजरात, महाराष्ट्र, आसाम, कर्नाटक आणि तामिळनाडू आदी विविध राज्यांमध्ये अनेक नवीन मेगा–प्रोजेक्ट्सवर वेगानं काम सुरू आहे. येत्या ७ ते ८ वर्षांत देशात आणखी ५ ते ८ नवीन सेमीकंडक्टर प्लांट पूर्ण क्षमतेने सुरू होण्याची अपेक्षा आहे. यामुळे भारतात लाखो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष उच्च–कौशल्याच्या रोजगाराच्या संधी निर्माण होतील. इस्रो आणि भारतीय संरक्षण दलांसाठी आवश्यक असणाऱ्या उपकरणांमध्ये स्वदेशी आणि सुरक्षित चिप्सचा वापर वाढवला जातोय. थोडक्यात सांगायचं तर, भारत सध्या सेमीकंडक्टर 'वापरणारा देश' कडून 'उत्पादक देश' बनण्याच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर आहे. या दृष्टिकोनातून सेमीकॉन २.० ही केवळ एक शासकीय आर्थिक योजना नसून भारताला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात 'आत्मनिर्भर' बनवणारी तंत्रज्ञान क्षेत्रातली एक चळवळ आहे. डिझाइन, उत्पादन, मानवी कौशल्य, संशोधन आणि पुरवठा साखळी या सर्व बाजूंचा सर्वसमावेशक विचार करून आखलेलं सेमीकॉन २.० हे धोरण भारताच्या सेमीकंडक्टर क्रांतीचा नवा अध्याय लिहिण्यात निर्णायक ठरेल.

# एका शिक्षिकेची लढाई; शेकडो मुलींच्या स्वप्नांना नवी भरारी

**शिक्षक दिन विशेष**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महानगरपालिका शाळेच्या वर्गात मुले कविता म्हणत आहेत. कुठे बाहुल्यांच्या माध्यमातून गोष्ट सुरू आहे, तर कुठे संविधान सापशिडीच्या खेळातून मुले हक्क आणि कर्तव्य शिकत आहेत. या सगळ्यात शिक्षिका कुंदा बच्छाव मुलांमध्ये मिसळून जातात. त्या म्हणतात, "ते जेवढं प्रेम देतात, त्या प्रेमामुळे मी स्वतःला नेहमी एक श्रीमंत शिक्षिका म्हणते."

ही गोष्ट आहे नाशिकच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यामंदिरातील शिक्षिका कुंदा बच्छाव यांची. यंदा त्यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. महानगरपालिका शाळेबद्दलची धारणा बदलण्यापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज शेकडो मुलींच्या शिक्षणापर्यंत पोहोचला आहे.

कुंदा बच्छाव शाळेत रुजू झाल्या, तेव्हा सर्वात मोठे आव्हान लोकांची मानसिकता होती. "मनपा शाळेत शिक्षण मिळत नाही, गुणवत्ता नाही, अशी लोकांची धारणा होती. लोकांचा दृष्टिकोन बदलायचा होता. मुलांना शाळेची गोडी लावायची होती. खासगी शाळांच्या तोडीस तोड माझी शाळा करायची, हा निर्धार आम्ही तेव्हाच घेतला," असे त्या सांगतात.

**अनुभवातून शिक्षण**

प्रत्येक मूल वेगळे असते, या तत्त्वानुसार त्या शिकवतात. अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांसाठी प्रत्येक वर्गात 'निपुण कोपरा' तयार केला. 'दत्तक मित्र–मैत्रीण' उपक्रमातून मुले एकमेकांना शिकवतात. त्यामुळे अभ्यासासोबत मुलांची मैत्री आणि सहकार्याची भावना वाढते. कुंदा बच्छाव यांनी तयार केलेली 'संविधान सापशिडी' मुलांना खेळता खेळता लोकशाही, हक्क आणि कर्तव्य शिकवते. "माहिती देणे सोपे आहे; पण विचार करण्याची क्षमता निर्माण करणे हे शिक्षणाचे खरे काम आहे," असे त्यांचे मत आहे.

शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता जाधव म्हणतात, "आमच्या शाळेच्या विकासामध्ये कुंदा बच्छाव मॅडम यांचा सिंहाचा वाटा आहे. त्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अहोरात्र मेहनत करत असतात."

**मुलींच्या शिक्षणासाठी पुढाकार**

२०२१ मध्ये कोरोना काळात घराघरात सर्वेक्षण करताना कुंदा बच्छाव यांना आठवीनंतर शाळा सोडलेल्या मुली भेटल्या. एका मुलीने सांगितले, "टीचर, मला शिकायचं आहे. पण आई मला तिच्याबरोबर धुण्याभांड्याला घेऊन जाते." काही विद्यार्थिनींची लग्न झाल्याचेही त्यांना दिसले.

या परिस्थितीने अस्वस्थ झालेल्या कुंदा बच्छाव यांनी पाच मुलींचा शिक्षणाचा खर्च स्वतः उचलण्याचा निर्णय घेतला. यातून 'शैक्षणिक पालकत्व' हा उपक्रम सुरू झाला. हळूहळू अनेक लोक सहभागी झाले आणि आज सुमारे १५० मुली उच्च शिक्षण घेत आहेत. "भविष्यात आम्हीही तुमच्यासारखंच दुसऱ्या मुलींना मदत करू," असे या मुली सांगतात.

**पुस्तके मुलांच्या हातात**

'तरंग वाचनालय' उपक्रमातून शाळेतील पुस्तके कपाटात बंद न ठेवता भिंतींवर, वर्गाबाहेर आणि मैदानात ठेवली जातात. पुस्तक दिसले की मुलांनी ते उचलून वाचावे, हा त्यामागचा उद्देश आहे.

कुंदा बच्छाव यांच्या या कार्यामागे त्यांचा वैयक्तिक अनुभवही आहे. अकरावीत असताना त्यांच्या लग्नाचा निर्णय होत असताना शिक्षक त्यांच्या पाठीशी उभे राहिले. "जसे माझे शिक्षक माझ्यासाठी उभे राहिले, तसे आज मला या मुलींसाठी उभे राहणे गरजेचे आहे," असे त्या सांगतात.

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार हा त्यांच्या कार्याचा सन्मान आहे. मात्र त्यांच्यासाठी खरी श्रीमंती पदकात नाही, तर मुलांच्या प्रेमात आणि शिक्षणाच्या प्रवाहात परतलेल्या मुलींच्या स्वप्नांत आहे. म्हणूनच त्यांची ओळख आहे



*राज्यस्तरीय विज्ञान व गणित शिक्षक प्रशिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल दीपक महाजन यांचा सत्कार करताना संस्थेचे पदाधिकारी.*

# साने गुरुजी कन्या हायस्कूलचे दीपक महाजन यांची राज्यस्तरीय प्रशिक्षणासाठी निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित साने गुरुजी कन्या हायस्कूलचे उपशिक्षक दीपक रामभाऊ महाजन यांची आंध्र प्रदेशातील कुप्पम येथील 'अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन' येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान व गणित शिक्षक प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. 'Constructivism in Hands On Teaching' अर्थात कृतीयुक्त शिक्षणातून ज्ञानरचनावाद या विषयावर २२ ते २५ सप्टेंबरदरम्यान हे प्रशिक्षण होणार आहे. महाराष्ट्रातील निवडक शिक्षकांना यामध्ये आधुनिक शैक्षणिक तंत्रांचे प्रशिक्षण दिले जाणार असून, जळगाव जिल्ह्यातून दीपक महाजन यांची निवड झाली आहे. या प्रशिक्षणातून विज्ञान व गणित विषय कृती, प्रयोग आणि विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून अधिक सोप्या व रंजक पद्धतीने शिकविण्याच्या पद्धती आत्मसात करता येणार आहेत. त्याचा लाभ साने गुरुजी कन्या हायस्कूलमधील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थिनींना होणार आहे.

महाजन यांच्या या निवडीबद्दल अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयात विशेष बैठकीत पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष हेमकांत पाटील, सचिव संदीप घोरपडे, संचालक गुणवंतराव पाटील, ॲड. अशोक बावीस्कर, डॉ. एस. जे. शेख, किरण पाटील आणि दीपक सोनवणे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

साने गुरुजी कन्या हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अनिता बोरसे, मुख्याध्यापक सुनील पाटील, मुख्याध्यापक संजीव पाटील, मनीष उघडे, संजय जगताप व हितेश पाटील यांनीही महाजन यांना पुढील प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या निवडीबद्दल शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

# प्रताप महाविद्यालयात १६–१७ सप्टेंबरला राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा

## विजेत्यांना रोख रक्कम, चषक व प्रमाणपत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयात पूज्य साने गुरुजी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धा १६ व १७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. महाविद्यालयातील पूज्य साने गुरुजी सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत स्पर्धा होणार आहे.

साहित्य–कला, इतिहास, भूगोल, विज्ञान, समाजसुधारक, अर्थव्यवस्था, क्रीडा, पर्यावरण, राज्यव्यवस्था, विज्ञान–तंत्रज्ञान, मानवी हक्क व चालू घडामोडींसह विविध विषयांचा अभ्यासक्रम आहे. स्पर्धेत तीन फेऱ्या असून सामान्य ज्ञान, ऑडिओ–व्हिडिओ व बझर तसेच साने गुरुजी व समाजसुधारकांवरील प्रश्नांचा समावेश असेल.

प्रथम क्रमांकाला १० हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला ७ हजार रुपये व चषक, तर तृतीय क्रमांकाला ५ हजार रुपये व चषक देण्यात येणार आहे. उत्तेजनार्थ पारितोषिकांसह सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

स्पर्धेचे समन्वयक डॉ. किरण गावित, तर सह–समन्वयक प्रा. भाग्यश्री जाधव आहेत. महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, डॉ. मुकेश भोळे, डॉ. धनंजय चौधरी व डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले आहे.

# प्रभाग १७ मधील रस्ते, गटारींच्या दुरुस्तीला सुरुवात

## माजी नगरसेवक प्रताप शिंपी यांच्या निवेदनाची दखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील प्रभाग क्रमांक १७ मधील रस्ते व गटारींच्या दुरुस्तीच्या मागणीची अमळनेर नगरपरिषदेने तातडीने दखल घेत संबंधित कामांना सुरुवात केली आहे. झामी चौक, रामदेवजी बाबा चौक ते शिवाजीनगर तसेच शिरुड नाका परिसरातील रस्ते व गटारींच्या दुरुस्तीबाबत कुस्ती–मल्लविद्या महासंघाचे तालुकाध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्रताप शिंपी यांनी २५ ऑगस्ट रोजी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना निवेदन दिले होते.

या निवेदनातून प्रभागातील विविध नागरी समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी तातडीने दूर करण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत पालिका प्रशासनाने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. प्रभागातील समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यासाठी पाठपुरावा केल्याबद्दल स्थानिक रहिवाशांनी माजी नगरसेवक प्रताप शिंपी यांचे आभार मानले.

दरम्यान, प्रताप शिंपी यांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचे आभार व्यक्त केले असून, प्रभागातील उर्वरित नागरी समस्यांकडेही प्रशासनाने लक्ष देऊन त्या लवकरात लवकर मार्गी लावाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



*अमळनेर : येथील युवानेते हरिओम अग्रवाल यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना दै. ग्लोबल महातेजचे ऑपरेटर संजय सोनवणे, व रेडीओ मंगलध्वनीचे समन्वयक अजय पाटील.*

# अमळनेरात सर्पमित्राला सर्प दंश; धुळ्यात उपचार सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : घरातील गोधडीखाली लपलेल्या कोब्राला पकडताना सर्पमित्र विकास राजेंद्र धनगर (२२) यांना हाताला दंश झाला. ही घटना ३ सप्टेंबर रोजी ताडेपुऱ्यात घडली.

दंश झाल्यानंतरही धनगर यांनी प्रसंगावधान राखत कोब्राला पकडून बरणीत बंद केले आणि सर्पासह अमळनेर ग्रामीण रुग्णालय गाठले. डॉ. जी. एम. पाटील यांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारांसाठी त्यांना धुळे जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

विकास धनगर हे परिसरातील प्रसिद्ध सर्पमित्र असून त्यांनी आतापर्यंत अनेक सर्पांना पकडून जीवदान दिले आहे.




# कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नोंदणीसाठी आवाहन

## सीसीआय मार्फत होणार खरेदी, कृउबात मोफत नोंदणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कृषी उत्पन्न बाजार समिती ला सीसीआय केंद्र आधीच मंजूर झाले असून भारतीय कापूस महामंडळातर्फे कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी १ सप्टेंबर पासून तर ३१ ऑक्टोबर पर्यंत नोंदणीचे आवाहन करण्यात आले आहे.

कापूस महामंडळातर्फे किमान आधारभूत किमत अंतर्गत कापूस खरेदी करण्यात येणार आहे. अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीत नोंदणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी आधार कार्ड , कापूस पिकपेरा लावलेला सातबारा , फार्मर आय डी , बँक पासबुक आदींचे झेरॉक्स सोबत आणावे बाजार समितीत त्यांची नोंदणी मोफत करण्यात येईल असे आवाहन सभापती अशोक पाटील , सचिव डॉ उन्मेष राठोड यांनी केले आहे.

तसेच शेतकरी आपल्या मोबाईल मध्ये 'कपास किसान' ॲप डाउनलोड करून त्यातून देखील नोंदणी करता येईल असे आवाहन सीसीआय केंद्राचे प्रमुख योगेश राजपूत यांनी केले आहे.

# 'राज्यशास्त्र' विषय बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून महत्त्वाचा – प्राचार्य डॉ. जाधव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचा परिचय व स्वागत समारंभ ३ सप्टेंबर रोजी दुपारी ११ ते ३ यावेळी कै. शंकरराव राणे सभागृहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विजय तुंटे होते. यावेळी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, सिनेट सदस्य डॉ. धीरज वैष्णव, उपप्राचार्य डॉ. डी. आर. चौधरी, अंतर्गत गुणवत्ता अभिवचन कक्षाचे प्रमुख डॉ. मुकेश भोळे, पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. अमित पाटील, ज्ञान संसाधन केंद्राचे प्रमुख प्रा. दीपक पाटील, सिनेट सदस्य डॉ. संदीप नेरकर, डॉ. सुनील राजपूत, डॉ. राखी घरटे, डॉ. हर्ष नेतकर, प्रा. निर्भय सोनार, प्रा. रुपाली महाजन आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. जाधव यांनी राज्यशास्त्र विषयाचे आंतरविद्याशाखीय व बहुविद्याशाखीय महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांची प्रगती ही विषयातील आवडीवर अवलंबून असून, सर्वच विषयांचे महत्त्व कायम असल्याचे त्यांनी सांगितले. IQAC प्रमुख डॉ. मुकेश भोळे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (NEP) रचना समजून घेण्याचे आवाहन केले. प्रमाणपत्र, डिप्लोमा, पदवी तसेच ऑनर्स व संशोधन पदवीच्या संधींची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली.अध्यक्षीय भाषणात डॉ. विजय तुंटे यांनी




विभागाची वैभवशाली परंपरा जपण्यासोबतच अपयशाने खचून न जाता ताण–तणावाचा सकारात्मकपणे सामना करण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बौद्धिक कौशल्यांचे सादरीकरण केले. रांगोळी स्पर्धेसह विविध उपक्रम घेण्यात आले. सूत्रसंचालन आफ्रिन पठाण व श्वेता माळी यांनी केले, तर रमा चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रमास सुमारे १०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com




# न पैसे थे न रोटी, मां ने घरों में बर्तन मांजकर पढ़ाया, नेशनल अवॉर्ड से सम्मानित टीचर की कहानी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

ओडिशा के द्विती चंद्र साहू की कहानी त्याग, संघर्ष और हार न मानने के जज्बे की है। जिसे पढ़ाने के लिए मां ने दूसरों के घरों में बर्तन मांजे हों, भला शिक्षा की कीमत उससे अच्छा कौन जानता होगा। यही वजह है बच्चों को पढ़ाने के लिए उनकी निष्ठा और समर्पण को देखकर राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार से सम्मानित किया जा चुका है।

पेट खाली था पर इरादे पक्के थे। जिसने कभी भूख की तड़प सही थी आज वही ज्ञान का समंदर बनकर देश के बेहतर भविष्य का निर्माण कर रहे हैं। जी हां, यह कहानी ओडिशा की दुर्गम पहाड़ियों में बसे छोटे से गांव कोटापेटा से आने वाले द्विती चंद्र साहू की। उनकी सक्सेस स्टोरी संघर्ष. त्याग और अटूट संकल्प की मिसाल है।

## न पैसे थे न खाने को रोटी

द्विती चंद्र साहू, ओडिशा के रायगड़ा जिले के छोटे से गांव कोटापेटा के गरीब परिवार से आते हैं। उनका बचपन संघर्षों में बिता है। भूख की तड़प क्या होती है, उन्होंने बहुत करीब से जाना है। कई रातें खाली पेट बिताई हैं। फिर भी उन्होंने उम्मीद नहीं छोड़ी थी, क्योंकि उनकी मां सबसे बड़ी हिम्मत थी।

## मां ने घरों में बर्तन मांजकर पढ़ाया

पिता का साया बचपन में ही उठ गया था। गरीबी कदम-कदम पर इम्तिहान ले रही थी। तब उनकी मां ढाल बनकर खड़ी रहीं। मां ने दिन-रात मेहनत की ताकि बेटा पढ़-लिखकर अपने पैरों






पर खड़ा हो सके। उन्होंने एक इंटरव्यू में कहा था, 'मेरी मां ने मुझे पढ़ाने के लिए दूसरों के घरों में बर्तन मांजे हैं।'

## खुद भी अखबार बेचकर की पढ़ाई

द्विती साहू ने दुर्गम इलाके में रहकर पढ़ाई की है, जहां अक्सर बिजली और इंटरनेट जैसी बेसिक सुविधाएं नहीं थीं। फिर भी उनका इरादा कमजोर नहीं हुआ। उन्होंने किसी तरह मैट्रिक तक की परीक्षा पास की। लेकिन आगे की पढ़ाई करने का रास्ता उनके लिए काफी कठिन था।

उन्होंने रोज पैदल चलकर अखबार बेचे और अपनी आगे की पढ़ाई का खर्च निकाला। वे कहते हैं, 'एक समय ऐसा था जब मेरे पास कुछ नहीं था और मैं सोचता था कि आगे पढ़ाई कैसे होगी।'

## पीएचडी करके शिक्षक बने

यह संघर्ष ही उनके जीवन की सबसे बड़ी प्रेरणा बन गया। उन्होंने जनजातीय अध्ययन में पीएचडी की पढ़ाई की। साल १९९७ से २००१ तक पत्रकारिता की पढ़ाई और इसके बाद सरकारी ट्रेनिंग पूरी करके टीचर बने। उन्होंने रायगढ़ के सरकारी स्कूल, बिळ्सेसू में अपनी सेवाएं देते हुए शिक्षा को सिर्फ चार दीवारों तक सीमित नहीं रखा।

## दूसरी जगहों से वीडियो डाउनलोड करके लाए, फिर बच्चों को पढ़ाया

उन्होंने एक ऐसे दूर-दराज पहाड़ी जिले में कई चुनौतियों के बावजूद, बिजली या इंटरनेट पर निर्भर हुए बिना अपनी क्लास में क्रिएटिव तरीके से ICT को शामिल किया है। उनकी पहलों में एजुकेशनल गेम्स बनाना, एक YouTube चैनल शुरू करना और सॉफ्टकॉपी PDF कंटेंट तैयार करना शामिल है। वे बिजली-इंटरनेट कनेक्टिविटी वाले इलाकों में जाते थे और वीडियो डाउनलोड करके अपने स्कूल के बच्चों को पढ़ाते थे।

## बच्चों को पढ़ाने में पत्रकारिता के अनुभव को उतारा

अपनी पत्रकारिता की पढ़ाई और अनुभव का इस्तेमाल बच्चों को पढ़ाने में किया। द्विती साहू ने कई अनूठे प्रयोग किए जैसे- अमा बैंक, बाल अदालत, आर्ट, पपेट शो, पेंटिंग आदि। दो भाषाओं वाली शिक्षा (बाइलिंगुअल एजुकेशन) को बढ़ावा देने के लिए, वह आदिवासी भाषाओं के शब्दकोशों और ओडिया व कोवी भाषाओं में द्विभाषी कहानी की किताबों का इस्तेमाल करते हैं।

गणित सिखाने के लिए वह कंचों (marbles) का इस्तेमाल करते हैं और क्रिएटिव लर्निंग के लिए फ्लैशकार्ड का उपयोग करते हैं। द्विती साहू ने 'परिमाल पाठशाला' के जरिए 'फंडे' (Funday) शनिवार की शुरुआत की, जिसमें साफ-सफाई और सुरक्षा पर जोर दिया गया।

साथ ही, उन्होंने 'पिटारा शिक्षण पेटी' भी शुरू की, जिसमें कम लागत वाले एजुकेशनल टूल्स बनाने के लिए रीसाइकल की गई चीजों का इस्तेमाल किया जाता है।

## नेशनल टीचर्स अवॉर्ड से हुए थे सम्मानित

उन्होंने स्कूल कोऑपरेटिव स्टोर, एक आदिवासी म्यूजियम, एक MLE रीडिंग कॉर्नर और एक क्राफ्ट कॉर्नर भी बनाया, ताकि छात्रों का सर्वांगीण विकास हो सके। शिक्षा और राष्ट्र-निर्माण में उनके बेहतरीन योगदान के लिए उन्हें राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू ने 'नेशनल अवॉर्ड फॉर टीचर्स २०२४' से सम्मानित किया था।




# अपनी पढ़ाई के लिए ₹६० रोज पर बच्चों को पढ़ाया, आज उसी स्कूल में सरकारी 'मदर टीचर', मिलेगा नेशनल अवॉर्ड






ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दिल्ली के सरकारी स्कूल में प्राइमरी टीचर करीब २० साल से बच्चों को शिक्षित कर रही हैं। २००४ तक, वह महीने में लगभग १,२००-१,३०० रुपये कमा रही थीं। जिससे वे अपनी कॉलेज की फीस भरती थीं। २००९ में सरकारी नौकरी लगी और २०१३ में उसी स्कूल में टीचर बनकर आईं, जहां से उन्होंने १२वीं की पढ़ाई की थी।

कहते हैं 'धैर्य और लगन से किया गया काम हमेशा सफल होता है।' दिल्ली की 'मदर टीचर' सुमन गोयल की सक्सेस स्टोरी इसका सबसे अच्छा उदाहरण है। कभी खुद की पढ़ाई करने के पैसे नहीं थे। परिवार आर्थिक संकट से जूझ रहा था। उन हालातों में सुमन ने सिर्फ नए रास्ते तलाशे, बल्कि उनका सफर पहले स्टेट टीचर्स अवॉर्ड और अब नेशनल टीचर्स अवॉर्ड तक पहुंच गया है।

## हरियाणा की बेटी ने दिल्ली में खुद लिखी अपनी तकदीर

हरियाणा के जींद जिले स्थित जुलाना गांव की रहने वाली सुमन की शुरुआती पढ़ाई गांव में ही हुई थी। बचपन में वह डॉक्टर बनना चाहती थीं, लेकिन १०वीं के बाद परिवार पर आए आर्थिक संकट के कारण उन्हें दिल्ली शिफ्ट होना पड़ा। वर्ष २००२ में १२वीं पास की। लेकिन परिवार की स्थिति ठीक नहीं हुई।

## अपनी पढ़ाई के लिए ₹६० रोज पर बच्चों को पढ़ाया

सुमने गोयल, दिल्ली के नॉर्थ वेस्ट B-१ स्थित रोहिणी क्षेत्र के पूठ कलां स्थित सर्वोदय कन्या विद्यालय से पढ़ाई की है। १२वीं क्लास में वे स्कूल टॉप रह चुकी हैं। इसके बाद, उन्होंने दिल्ली यूनिवर्सिटी (DU) के लक्ष्मीबाई कॉलेज में बीए में एडमिशन लिया। ग्रेजुएशन के दौरान वे अपने परिवार पर पढ़ाई के खर्च का अतिरिक्त दबाव नहीं डालना चाहती थीं। तब उन्होंने उसी स्कूल का रुख किया, जहां से उन्होंने १२वीं की पढ़ाई पूरी की थी। उन्होंने स्कूल में पढ़ाना शुरू कर दिया। २००४ तक, वह महीने में लगभग १,२००-१,३०० रुपये कमा रही थीं। उन्हें रोज के हिसाब से ६० रुपये मिलते थे। जिससे वे अपने कॉलेज की पढ़ाई का खर्च निकाल लेती थीं।

## २००९ में लगी सरकारी टीचर की नौकरी

स्कूल के टीचर्स के मार्गदर्शन से उन्होंने प्रतियोगी परीक्षाओं की तैयारी की। साल २००९ में उनकी स्थायी सरकारी नौकरी लगी और साल २०१३ से वह इसी स्कूल में प्राइमरी टीचर के रूप में सेवाएं दे रही है। उनका कहना है कि अपने पुराने स्कूल में लौटना सिर्फ करियर का एक फैसला नहीं था। यह उस संस्थान में वापसी थी जिसे वह अपनी जिंदगी को संवारने का श्रेय देती हैं।

## मदर टीचर की तरह पढ़ाती हैं

सुमन खुद को एक मदर टीचर मानती हैं। वह कहती हैं, 'सभी बच्चों के परिवार से में परिचित हूं। इससे मुझे बच्चों को समझने और पढ़ाने में मदद मिलती है। पूठ कलां, कृष्ण विहार और मांगे राम पार्क जैसे क्षेत्रों से आने वाले ज्यादातर बच्चे पहली पीढ़ी में पढ़ाई करने आए है, जिनके माता-पिता दिहाड़ी मजदूर हैं। इसलिए इन बच्चों को समझना जरूरी है।' वे सिर्फ पढ़ाई पर ही नहीं, बल्कि जरूरतमंद बच्चों के स्वेटर, स्टेशनरी, सेहत और पोषण का भी पूरा ध्यान रखती हैं।

## पढ़ाने के लिए अपनाती हैं अलग तरीके

सुमन कहती है, 'कमजोर बच्चों के लिए मैं पीयर ग्रुप अप्रोच अपनाती हूं। विशेष आवश्यकताओं वाले बच्चों को माहौल में घुलने में मदद करती हूं। हर क्लास में ४ से ५ बच्चे ऐसे होते है, जिन पर ज्यादा ध्यान देने की जरूरत होती है। मैने निपुण मैथ्स किट विकसित की थी। उन्होंने निपुण मैथ्स किट भी तैयार की, जिसे राज्य स्तर पर सराहा गया।

## 'परिवार और पति ने बढ़ाई हिम्मत'

कम उम्र में ही माता-पिता को खो देने के बाद सुमन को शादी के बाद पति गौरव का पूरा सहयोग मिला। राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार की दो-तीन महीने चलने वाली आवेदन प्रक्रिया के लिए पति ने घर पर आईटी सुविधाएं जुटाई और उन्हें आवेदन के लिए प्रेरित किया।

## २०२२ में स्टेट, तो २०२६ में मिलेगा नेशनल टीचर्स अवॉर्ड

करीब २० साल से ज्यादा समय के बाद, दिल्ली के रोहिणी में GSKV पूठ कलां स्कूल में प्राइमरी टीचर सुमन गोयल को 'नेशनल टीचर्स अवॉर्ड २०२६' के लिए चुना गया है। ५ सितंबर को उन्हें विज्ञान भवन में सम्मानित किया जाएगा। इससे पहले सुमन गोयल को २०२२ में स्टेट टीचर्स अवॉर्ड से सम्मानित किया गया था।

# श्री कृष्ण जन्माष्टमी : उपवास आणि पूजा विधी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

## उपवासाची पद्धत

उपवास हा प्रत्येकाच्या श्रद्धा आणि शारीरिक क्षमतेनुसार वेगवेगळा असू शकतो. काही लोक पूर्ण दिवस निर्जळी उपवास करतात, तर काही फलाहार किंवा दूध-फळे घेतात. शरीरावर जास्त ताण न देता उपवास करावा.

## उपवासाची तयारी

जन्माष्टमीच्या आदल्या दिवसापासूनच मनाची आणि शरीराची तयारी करावी.
सात्विक आणि हलका आहार घ्यावा. कांदा, लसूण, मांस, मद्यपान टाळावे.
रात्री 'ओम नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करून शांत चित्ताने झोपावे.



## पूजेचा दिवस

सकाळी लवकर उठून स्नान करावे आणि स्वच्छ वस्त्र परिधान करावीत. देवघर स्वच्छ करून श्रीकृष्णांची किंवा बालकृष्णांची मूर्ती पूजास्थानी ठेवावी. फुले, तुळशीची पाने आणि सात्विक वस्तूंनी देवघर सजवावे.

**संकल्प :** हातात थोडे पाणी घेऊन "हे श्रीकृष्णा, आज मी श्रद्धापूर्वक तुझे व्रत करत आहे, माझ्याकडून कोणतीही चूक होऊ नये आणि माझ्या कुटुंबावर तुझा आशीर्वाद राहो" असा संकल्प करावा.

## उपवासात काय खावे?

फळे, दूध, दही, सुका मेवा, शहाळ्याचे पाणी. साबुदाणा, बटाटा, राजगिरा यांचे पदार्थ (उपवासाचे सैंधव मीठ वापरून). जास्त तेलकट किंवा तळलेले पदार्थ खाणे टाळावे.

## काय टाळावे?

धान्य (तांदूळ, गहू, डाळी) खाणे टाळावे. मांसाहार, मद्यपान आणि तामसिक पदार्थ पूर्णपणे वर्ज्य करावेत. राग, वाद आणि नकारात्मक विचार टाळून नामस्मरण करावे.

## उपवास सोडण्याची पद्धत (पारण)

उपवास सोडण्याच्या दोन प्रचलित पद्धती आहेत:

**पद्धत १:** मध्यरात्री कृष्ण जन्मोत्सवाची पूजा आणि आरती झाल्यानंतर उपवास सोडला जातो.

**पद्धत २:** शास्त्रानुसार, पुढील दिवशी सूर्योदयानंतर उपवासाचे पारण केले जाते.

**पारण विधी:** उपवास सोडताना प्रथम श्रीकृष्ण यांना नैवेद्य दाखवावा. तुळशीपत्रासह प्रसाद ग्रहण करावा. सुरुवातीला पाणी, दूध किंवा हलका आहार घेऊन उपवास सोडावा.

**विशेष सूचना:** लहान मुले, वृद्ध, गर्भवती महिला किंवा औषधे घेणाऱ्या व्यक्तींनी उपवासाची कठोर पद्धत पाळण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा.

**श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या तुम्हाला खूप खूप शुभेच्छा!**

# शास्त्रात चार रात्री विशेष पुण्य प्रदान करणाऱ्या आहेत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

महाशिवरात्रिची रात्र, होळी ची रात्र, कृष्ण जन्माष्टमी ची रात्र आणि, दीपावली ची रात्र.

या विशेष रात्रींचे जप, तपश्चर्या आणि जागरण करणे खूप फायदेशीर आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या रात्रीला मोहरात्री म्हणतात. या रात्री जागृत राहून योगेश्वर श्री कृष्णांचे ध्यान, नाम किंवा मंत्र जप केल्याने संसाराच्या मोह मायेतून मुक्ती मिळते. जन्माष्टमी हे व्रत व्रतराज आहे. त्यामूळे त्याचे पालन केले पाहिजे.

## जन्माष्टमी व्रत-उपवास चे महत्व

जन्माष्टमीचे व्रत ठेवावे, त्याचे खूप फायदे आहेत. यामुळे सात जन्मांची पाप ताप दूर होतात. जन्माष्टमी हा एक तर उत्सव आहे, दुसरा मोठा सण आहे, तिसरा हे महान व्रत उपवास आणि पवित्र दिवस आहे.

## जन्माष्टमीच्या दिवसाचा महिमा

'वायू पुराण' आणि इतर अनेक ग्रंथांमध्ये लिहिलेला आहे. 'जो जन्माष्टमीच्या रात्री सणापूर्वी अन्न खातो तो नराधम आहे.

असे सुध्दा वर्णन येते की, जो उपवास करतो, जप करतो, ध्यान करतो आणि मग नंतर जेवतो (दुसऱ्या दिवशी उपवास सोडतो) तो त्याच्या कुटुंबाच्या २१ पिढ्या तारून नेतो आणि तो व्यक्ती ईश्वराच्या निराकार किंवा साकार तत्वात प्राप्त करण्याच्या क्षमतेच्या दिशेने खूप पुढे जातो. याचा अर्थ असा नाही की उपवासाचा महिमा ऐकून मधुमेह असणाऱ्या किंवा अशक्त लोकांनीही संपूर्ण उपवास ठेवावा. लहान मुले, अशक्त व वृद्ध यांनी काही फळे वगैरे सोयीनुसार खावीत. शरीर मानाने व्रत करावे. जन्माष्टमीच्या दिवशी केलेल्या नामजपाचे अनंत फल प्राप्त होते, त्यातही जन्माष्टमीची संपूर्ण रात्र जागून जप आणि ध्यान करण्याचे विशेष महत्त्व आहे. जो **क्लीम कृष्णाय नमः** मंत्र आणि गुरु मंत्राचा थोडा वेळ जप करेल त्याचे त्रिताप नष्ट होतात.

भविष्य पुराणानुसार, जन्माष्टमीचे व्रत जगामध्ये सुख-शांती आणि सजीवांना रोगमुक्त जीवन देते, अकाली मृत्यू टाळते, गर्भपाताच्या त्रासांपासून वाचवते आणि दुर्दैव आणि कलह दूर करते.

# गोकुळाष्टमी विशेष : श्रीकृष्णाच्या नैवेद्याच्या ६ सोप्या आणि पारंपारिक रेसिपीज

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

गोकुळाष्टमीच्या दिवशी श्रीकृष्णाला दाखवण्यासाठी ६ नैवेद्य रेसिपीज आणि पूजेचे नियम खालीलप्रमाणे आहेत :

## १. सुंठवडा (पंचामृत)

कृष्ण जन्मानंतर सर्वात पहिला दाखवला जाणारा नैवेद्य.

**साहित्य :** १ चमचा सुंठ पूड, १ चमचा धने पूड, खसखस, सुके खोबरे, गूळ, तूप आणि हळद.

**कृती:**
तुपात सर्व पूड ३० सेकंद परतून घ्या.
त्यात गूळ आणि थोडे पाणी घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत ढवळा.
शेवटी वर २ तुळशीची पाने ठेवा.

**टीप:** हा प्रसाद वर्षभर टिकतो आणि आरोग्यासाठी उत्तम असतो.

## २. धनिया पंजीरी (मथुरा स्पेशल)

**साहित्य :** १ वाटी धने (जाडसर दळलेले), ३/४ वाटी पिठीसाखर, १/२ वाटी तूप, बदाम, काजू, मनुके, खसखस.

**कृती :**
धने कोरडे भाजून घ्या आणि सुवास सुटल्यावर जाडसर दळून घ्या.
तुपात काजू, बदाम, खसखस आणि खोबरे तळून घ्या.
सर्व साहित्य एकत्र करून त्यात पिठीसाखर व वेलची पूड घालून हाताने मिक्स करा (गॅसवर ठेवू नये).

**टीप :** हे उपवासाला चालते आणि ८ दिवस टिकते.

## ३. माखन मिश्री

**साहित्य :** २०० ग्रॅम ताजे पांढरे लोणी (घरी बनवलेले), १०० ग्रॅम खडीसाखर, केशर, तुळशीचे पान.

**कृती :**



लोणी चांगले फेटून घ्या आणि त्यात कुटलेली खडीसाखर मिसळा.
१ चमचा केशराचे दूध घाला.
मातीच्या भांड्यात काढून वर तुळशीचे पान ठेवा.

## ४. उपवासाची कुरकुरीत मठरी / शंकरपाळी

**साहित्य :** २ वाटी राजगिरा किंवा शिंगाड्याचे पीठ, १ उकडलेला बटाटा, जिरे, मीठ, तळण्यासाठी तूप.

**कृती :**
उकडलेला बटाटा, पीठ, जिरे आणि मीठ एकत्र करून मळून घ्या (पाणी वापरू नये).
जाडसर पोळी लाटून कापण्या कापून घ्या.
मंद आचेवर तळून घ्या.

## ५. तांदूळ आणि साबुदाणा मिक्स खीर

**साहित्य :** १/४ वाटी तांदूळ, १/४ वाटी साबुदाणा, १ लिटर दूध, साखर, वेलची, तुळशीचे पान.

**कृती :**
तांदूळ आणि साबुदाणा १ तास भिजत ठेवा.
दुधात मंद आचेवर ३० मिनिटे शिजवून घ्या.
साखर, वेलची पूड आणि तुळशीचे पान घालून नैवेद्य दाखवा.

## ६. झटपट मथुरा पेढा

**साहित्य :** २५० ग्रॅम खवा, १०० ग्रॅम पिठीसाखर, वेलची पूड, पिस्त्याचे तुकडे.

**कृती :**
खवा कुस्करून मंद आचेवर ३ मिनिटे गरम करा.
गॅस बंद करून त्यात पिठीसाखर आणि वेलची पूड मिक्स करा.
लहान गोळे बनवून वर पिस्ता लावा.

अष्टमीच्या पूजेचे नियोजन

**सकाळची तयारी :** घर स्वच्छ करून श्रीकृष्णासाठी झोपाळा फुले व मोरपिसांनी सजवावा.

**संध्याकाळ/रात्र :** रात्री १२ वाजता कृष्णजन्म झाल्यावर शंख वाजवून सुंठवडा, पंजीरी आणि लोणी-मिश्रीचा नैवेद्य दाखवावा.

**महत्त्वाची टीप : प्रत्येक नैवेद्यावर तुळशीपत्र ठेवणे आवश्यक आहे.**






# गोपाळकाला आणि दहीहंडी!

## जाणून घ्या या उत्साही परंपरेचा इतिहास आणि धार्मिक महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दहीहंडी हा सण दरवर्षी कृष्ण जन्माष्टमीनंतर म्हणजे दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. श्रावण महिन्यातील कृष्ण पक्षातील नवमी तिथीला हा दहीहंडीचा सण साजरा केला जातो. देशभरात दरवर्षी दहीहंडी सण मोठ्या उत्साहाने जल्लोषात साजरा केला जातो. विशेषतः महाराष्ट्रासह गुजरात, गोव्यात या सणाचा थाटमाट मोठा असतो. गोकुळाष्टमीला दिवसभर उपवास करून रात्री बारा वाजता पाळण्यातील बाळकृष्णांचा जन्म साजरा करतात व मग प्रसाद घेऊन उपवास सोडतात किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी दहीकाल्याचा प्रसाद घेऊन उपवास सोडतात. विविध खाद्यपदार्थ, दही, दूध, लोणी हे सगळे एकत्र कालविणे म्हणजे 'काला' होय. भगवान श्रीकृष्णांनी गोकुळात गायी चारतांना स्वतःची व सवंगड्यांच्या शिदोऱ्या एकत्र करून त्या खाद्यपदार्थांचा काला केला व सर्वांसह त्याचा आस्वाद घेतला. या कथेला अनुसरून पुढे गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची व दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली.

दहीहंडी हा भगवान श्रीकृष्णांच्या बालपणातील आठवणींना उजाळा देणारा सण आहे. याबाबत अशी आख्यायिका सांगितली जाते की, खोडकर बालकृष्णाला दही. दूध आणि लोणी (माखन) खूप आवडायचे. त्या काळी गोकुळात दूध, दही, लोणी साठवून ठेवले जात होते. तेव्हा भगवान श्रीकृष्ण त्यांच्या मित्रांसह शेजारच्या घरांतून दही आणि लोणी चोरण्याचा प्रयत्न करायचे. त्यामुळे त्यावेळी गोकुळातील महिलांनी भगवान कृष्णांच्या मित्र-सवंगड्यांच्या हाती दही-लोणी लागू नये म्हणून दही आणि लोण्याची मडकी छताला टांगायला सुरुवात केली. यावेळी कृष्ण मित्र-सवंगड्यांसह मानवी मनोरा बनवून मडकी फोडायचे आणि दही खाण्याचा आनंद घ्यायचे. असा खोडसाळपणा कृष्ण व त्याचे सवंगडी करीत असले तरीही गोकुळातील रहिवासी आनंदी होते. दहीहंडी उत्सव बालगोपाळांच्या बालपणापासूनच्या या खेळकर गमतीजमतींची आठवण करून देतो.

भगवान श्रीकृष्ण जयंतीच्या उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपालकाला असे म्हणतात. दहीहंडी आणि कृष्णजन्माष्टमी यांच्या निमित्ताने हा प्रसाद तयार केला जातो. श्रीकृष्णजयंती व्यतिरिक्त वर्षभरात जेव्हाजेव्हा काल्याचे कीर्तन होते तेव्हा तेव्हा त्या कीर्तनानंतर गोपालकाला होतो. म्हणूनच त्या कीर्तनाला "काल्याचे" कीर्तन म्हणतात. ज्ञानेश्वरीचे किंवा दासबोधाचे पारायण, किंवा अनेक दिवस चालणाऱ्या अशाच एखाद्या ग्रंथवाचनानंतर, अथवा कीर्तन महोत्सवामध्ये शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन होते. वारकरी संप्रदायात वारीची सांगता गोपाळकाला करूनच होते.



# भगवान कृष्ण- राधाचे एकमेकांवर नितांत प्रेम, पण दोघांनी लग्न का नाही केले?

## रुक्मिणी, सत्यभामाशी विवाह का केला? धर्मग्रंथातील 'हे' रहस्य कमी लोकांना माहित...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



प्रेम... ही एक अत्यंत सुंदर मानवी भावना आहे. ती केवळ आकर्षण किंवा जवळीक नसून विश्वास, आपुलकी, काळजी, त्याग आणि समर्पण यांचा अनुभव आहे. ज्याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे राधा-कृष्णांचे प्रेम... या दोघांचे प्रेम हे भारतीय भक्तीपरंपरेत निस्वार्थ प्रेम, समर्पण आणि भक्तीचे सर्वोच्च प्रतीक मानले जाते. त्यांचे नाते केवळ सांसारिक प्रेम म्हणून न पाहता त्यामागील आध्यात्मिक अर्थही महत्त्वाचा मानला जातो. भगवान श्रीकृष्ण आणि राधा यांची प्रेमकथा भारतीय पौराणिक कथा आणि भक्ती परंपरेत अत्यंत पूजनीय मानली जाते. त्यांचे एकमेकांवर नितांत प्रेम असूनही, दोघांनी एकमेकांशी लग्न केले नाही. यामागे अनेक धार्मिक आणि आध्यात्मिक कारणे दिली जातात.

धार्मिक मान्यतेनुसार, श्रीकृष्ण आणि राधा यांच्यातील प्रेम हे शारीरिक प्रेमाच्या पलीकडील एका दिव्य आणि अलौकिक प्रेमाचे प्रतीक आहे. हे प्रेम सांसारिक बंधनांपासून मुक्त आहे आणि आत्म्याच्या स्तरावर अस्तित्वात आहे, ज्यात विवाहासारख्या कोणत्याही सांसारिक नात्याचा समावेश नाही.

**राधा-कृष्णाने एकमेकांशी विवाह का केला नाही?**

धार्मिक मान्यतेनुसार, भगवान श्रीकृष्णांनी राधेशी लग्न केले नाही कारण त्यांचा अवतार हा धर्माची स्थापना करण्यासाठी होता. त्यांनी यशोदा आणि नंद यांचे पुत्र म्हणून आपले जीवन व्यतीत केले, त्यांच्या जीवनप्रवासाचा मुख्य उद्देश मानवजातीला धर्म आणि सत्याचा मार्ग दाखवणे हा होता, आणि म्हणूनच, त्यांनी राधेशी विवाह केला नाही.

**राधा ही देवाची सर्वोच्च भक्त...**

राधा आणि श्रीकृष्ण यांच्यातील नाते हे भक्त आणि देव यांच्यातील नाते दर्शवते. राधा ही देवाची सर्वोच्च भक्त मानली जाते, आणि त्यांचे प्रेम हे भक्त आणि देव यांच्यातील सर्वात मोठी भक्ती म्हणून पाहिले जाते. अशाप्रकारे, त्यांचे प्रेम विवाहाच्या पलीकडचे आहे.

**भगवान कृष्णाने देवी रुक्मिणी, सत्यभामा तसेच इतर राण्यांशी विवाह का केला?**

धार्मिक मान्यतेनुसार, भगवान कृष्णांचे जीवन अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांनी भरलेले होते. ते द्वारकेला गेले आणि त्यांनी रुक्मिणी, सत्यभामा तसेच इतर राण्यांशी विवाह केला, जे त्यांच्या कर्तव्याचाच एक भाग होता. त्यांनी धर्म आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी कर्मे केली, आणि म्हणूनच, त्यांनी राधेशी विवाह केला नाही.

**राधा म्हणजे देवी लक्ष्मीचा अवतार?**

काही आख्यायिकांनुसार, राधा ही भगवान विष्णूंची पत्नी देवी लक्ष्मी यांचा अवतार होती असे मानले जाते आणि तिचा जन्म विवाहासाठी नव्हे, तर भगवान श्रीकृष्णांचे प्रेम पूर्ण करण्यासाठी झाला होता. राधा आणि श्रीकृष्णांचे प्रेम या जगात एक असाधारण उदाहरण मानले जाते.

# श्रीकृष्णांनी कधी चालवले सुदर्शन चक्र?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भगवान श्रीकृष्णांचे सुदर्शन चक्र हे त्यांच्या सर्वात शक्तिशाली दिव्य अस्त्रांपैकी एक मानले जाते. धर्माचे रक्षण आणि अधर्माचा नाश याचे प्रतीक म्हणून सुदर्शन चक्राकडे पाहिले जाते.

भगवान श्रीकृष्णांचे सुदर्शन चक्र हे त्यांच्या सर्वात शक्तिशाली दिव्य अस्त्रांपैकी एक मानले जाते. धर्माचे रक्षण आणि अधर्माचा नाश याचे प्रतीक म्हणून सुदर्शन चक्राकडे पाहिले जाते. हरिवंश पुराण आणि महाभारताशी संबंधित विविध कथांमध्ये श्रीकृष्णांनी सुदर्शन चक्राचा वापर केल्याचे अनेक प्रसंग आढळतात. काही ठिकाणी त्यांनी दुष्टांचा वध करण्यासाठी त्याचा वापर केला, तर काही प्रसंगी धर्मरक्षणासाठी या दिव्य अस्त्राचा आधार घेतला. जाणून घेऊया श्रीकृष्णांच्या सुदर्शन चक्राशी संबंधित प्रमुख प्रसंग.

**शिशुपालाचा वध**

सुदर्शन चक्राशी संबंधित सर्वात प्रसिद्ध प्रसंगांपैकी एक म्हणजे शिशुपाल वध. राजसूय यज्ञादरम्यान शिशुपालाने भगवान श्रीकृष्णांचा वारंवार अपमान केला. श्रीकृष्णांनी शिशुपालाची आई, जी नात्याने त्यांची आत्या होती, हिला वचन दिले होते की ते शिशुपालाच्या शंभर चुका माफ करतील. शिशुपालाच्या शंभर चुका पूर्ण झाल्यानंतरही त्याने श्रीकृष्णांचा अपमान करणे सुरूच ठेवले. अखेर श्रीकृष्णांनी सुदर्शन चक्र चालवले. सुदर्शन चक्राने शिशुपालाचे मस्तक धडापासून वेगळे केले आणि त्याचा मृत्यू झाला.

**पौंड्रकाचा वध**

पौंड्रक नावाचा एक राजा स्वतःला खरा वासुदेव असल्याचे सांगत असे. तो श्रीकृष्णांप्रमाणेच शंख, चक्र आणि इतर चिन्हे धारण करत असे. स्वतःला भगवान समजणाऱ्या पौंड्रकाचे रूपही श्रीकृष्णांसारखे आकर्षक असल्याचे कथांमध्ये वर्णन आढळते. मात्र त्याच्या दुष्ट वर्तनामुळे त्याला कोणीही पसंत करत नव्हते. पौंड्रक आणि श्रीकृष्ण यांच्यात युद्ध झाले. या युद्धाच्या अखेरीस श्रीकृष्णांनी सुदर्शन चक्राचा वापर करून पौंड्रकाचा वध केला.

**जयद्रथ वधावेळी सुदर्शन चक्राचा प्रयोग**

महाभारताच्या युद्धाच्या १४व्या दिवशी अर्जुनाने सूर्यास्तापूर्वी जयद्रथाचा वध करण्याची प्रतिज्ञा केली होती. अर्जुनाला वेळेत जयद्रथापर्यंत पोहोचवण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी आपल्या योगमायेचा आधार घेतला. परंपरागत कथांनुसार, श्रीकृष्णांनी सुदर्शन चक्राच्या साहाय्याने काही काळ सूर्य झाकून ठेवला. त्यामुळे सूर्यास्त झाल्याचा भास निर्माण झाला. सूर्यास्त झाल्याचे समजून जयद्रथ समोर आला. त्याच वेळी श्रीकृष्णांनी अर्जुनाला संकेत दिला आणि अर्जुनाने जयद्रथाचा वध केला.

अशा प्रकारे सुदर्शन चक्र हे भगवान श्रीकृष्णांच्या दिव्य शक्तीचे एक रूप मानले जाते. पुराणांमध्ये असाही एक प्रसंग आढळतो, ज्यात राधेने श्रीकृष्णांच्या सुदर्शन चक्राच्या साहाय्याने एका राक्षसाचा वध केल्याचे सांगितले जाते. सुदर्शन चक्राचा मुख्य उद्देश अधर्माचा नाश करून धर्माचे रक्षण करणे हाच असल्याचे धार्मिक कथांमध्ये नमूद केले आहे.

# भगवान श्रीकृष्णांबद्दल उत्कृष्ट माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) श्रीकृष्णांचा जन्म ५२५२ वर्षांपूर्वी झाला.
२) जन्मतारीख १८ जुलै,३२२८ ई.स. पूर्व
३) महिना : श्रावण
४) दिवस : अष्टमी
५) नक्षत्र : रोहिणी
६) दिवस : बुधवार
७) वेळ : १२:०० रात्री
८) श्री कृष्ण यांचे १२५ वर्षे, ८ महिने आणि ७ दिवस आयुष्य.
९) अवतार समाप्तीची तारीख १८ फेब्रुवारी ३१०२ ईसा पूर्व
१०) जेव्हा कृष्ण ८९ वर्षांचे होते महायुद्ध (कुरुक्षेत्र युद्ध) झाले.
११) कुरुक्षेत्र युद्धानंतर ३६ वर्षांनी त्यांचा मृत्यू झाला.
११) कुरुक्षेत्र युद्ध मृग नक्षत्र शुक्ल एकादशी, १३३९ रोजी सुरु झाले होते.
१२) २१ डिसेंबर १३३९ ईसा पूर्व रोजी "दुपारी ३ ते संध्याकाळी ५ दरम्यान सूर्यग्रहण होते (जयद्रथच्या मृत्यूचे कारण.)
१३) भीष्म २ फेब्रुवारी, (उत्तरायणाची पहिली एकादशी), ३१३८ ईसा पूर्व अवतार समाप्ती.

भगवान श्रीकृष्णांची भारतातील प्रत्येक राज्यात वेगळ्या नावाने पूजा केली जाते.
मथुरेत कृष्ण, कन्हय्या
ओडिशामध्ये जगन्नाथ
महाराष्ट्रात विठ्ठल, विठोबा
राजस्थानमध्ये श्रीनाथ
गुजरातमध्ये द्वारकाधीश
गुजरातमध्ये रणचोछोड
कर्नाटकातील उडुपी, कृष्णा
केरळमधील गुरुवायुरप्पन

**जन्म ठिकाण :-** मथुरा

जन्मदाते माता पिता :- देवकी, वासुदेव
**संगोपन करणारे पालक :-** यशोदा, नंद
**बहीण भाऊ :-** सुभद्रा, बलराम, (द्रौपदी मानलेली बहीण.)
**गुरु, शिक्षक :-** ऋषी संदिपनी
**जिवलग मित्र :-** सुदामा

**धर्मपत्नी ८ :-** रुक्मिणी, सत्यभामा, जांबवती, कालिंदी, मित्रविंदा, नागनाजिती, भद्रा, लक्ष्मना (शिवाय त्यांनी नरकासुराच्या (भौमासुराच्या) कैदेतील १६,१०० स्त्रियांना सोडवले आणि त्यांच्यापैकी प्रत्येकीला पत्नीचा दर्जा दिला.)

**कृष्णाची मुले:- एकूण ८०**
श्रीकृष्ण आणि रुक्मिणीची मुले (एकूण १०) : प्रद्युम्न (थोरला), चारुदेष्ण, सुदेष्ण, चारुदेह, सुचारु, चारुगुप्त, भद्रचारु, चारुचंद्र, विचारु आणि चारु.

**श्रीकृष्ण आणि सत्यभामाची मुले (एकूण १०) :** भानु, सुभानु, स्वभानु, प्रभानु, भानुमान, चंद्रभानु, बृहद् भानु, अतिभानु, श्रीभानु आणि प्रतिभानु.

**श्रीकृष्ण आणि जांबवतीची मुले (एकूण १०) :** सांब, सुमित्र, पुरुजित, शतजित, सहस्रजित, विजय, चित्रकेतु, वसुमान, द्रविन् आणि कृतु.

**श्रीकृष्ण आणि नग्नजिती ऊर्फ सत्याची मुले (एकूण १०) :** वीर, चंद्र, अश्वसेन, चित्रगु, वेगवान, वृष, आम, शंकु, वसु आणि कुंती.

**श्रीकृष्ण आणि कालिंदीची मुले (एकूण १०) :** श्रुत, कवि, वृष-२, वीर-२, सुबाहु, भद्र, शांती, दर्श, पूर्णमास आणि सोमक.

**श्रीकृष्ण आणि लक्ष्मणाची मुले (एकूण १०):** प्रबोध, गात्रवान, सिंह, बल, प्रबल, ऊर्ध्वग, महाशक्ती, सह, ओज आणि अपराजित.

**श्रीकृष्ण आणि मित्रविंदाची मुले (एकूण १०) :** वृक, हर्ष, अनिल, गृध्र, वर्द्धन, अन्नद, महश, पावन, वन्हि आणि क्षुधि.

**श्रीकृष्ण आणि भद्रा ऊर्फ शैब्याची मुले (एकूण १०):-** संग्रामजित, बृहत् सेन, शूर, प्रहरन, अर्जित, जय, सुभद्र, वाम, आयु आणि सत्यक.

**राधा:-** राधा ही श्रीकृष्णांची परमप्रिया आहे असा उल्लेख आहे. राधा ही श्रीकृष्णांची प्रेयसी किंवा भक्त होती.
राधा व श्रीकृष्ण हे मूळचे सांख्यशास्त्रातील प्रकृती व पुरुष होत, असे काहींचे मत आहे. राधा हे कृष्णांचेच स्त्रीरूप आहे व श्रीकृष्णच राधेचे पुरुषरूप आहे,' असेही म्हटले जाते. श्रीकृष्ण अगदी लहान असताना ज्या गोपिकांबरोबर खेळत असे त्यांपैकी एक राधा होती.

**श्रीकृष्णांची आवड निवड व त्यांच्या खास वस्तु**

**आवडती फुल :-** फुलामध्ये



श्रीकृष्ण यांना पारिजातकाचे फुल जास्त आवडते. राधेने दिलेली वैजयंतीमाला (तुळशीची माळ) हीही त्यांच्या आवडीची आहे)

प्राण्यांमध्ये श्रीकृष्णांचा आवडता प्राणी म्हणजे घोडा. श्रीकृष्णांकडे चार पांढरेशुभ्र घोडे होते. श्रीकृष्णांनी त्यांची नावे त्यांच्या वैशिष्ट्यानुसार शैव्य, सुग्रीव, बलाहक आणि मेघपुष्प अशी ठेवली होती. श्री कृष्ण हे उत्तम (रथाचा) सारथी होते.

**शंख :-** शंखासुर नावाच्या दैत्याला यादव सेनेने मारले तेव्हा त्याच्या शवाजवळ पडलेला शंख श्रीकृष्ण यांनी उचलला आणि मथुरेला येऊन आचार्य सांदीपनी ऋषींना दिला. आचार्यांनी त्याचे नाव पांजजन्य ठेवून तो शंख भगवान श्रीकृष्ण यांना परत केला.

**आयुधं :-** त्याचबरोबर सांदीपनींनी त्यांना अतितंजय नावाचे धनुष्य दिले. शिवाय श्रीकृष्णांकडे सुदर्शन चक्र होते. हे चक्र भगवान विष्णू यांनी उत्तराखंडमधील गढवाल जिल्ह्यातील श्रीनगर गावात असलेल्या कमलेश्वर शिवमंदिरात तपश्चर्या करून मिळवले होते. ते भगवान विष्णू यांनी त्यांच्या कृष्णावतारात धारण केले व वापरले.

**बासरी :-** श्रीकृष्णांकडे मुरली होती. पहिली मुरली त्यांना त्यांचे पिता नंद यांनी दिली होती .

**मोरपंख :-** रामजन्मातील मोराचे ऋण फेडण्यासाठी पुढील श्रीकृष्ण जन्मात नेहमी मोरपीस आपल्या मुकुटात धारण करत असे.

**शिक्षण :-** श्रीकृष्ण आणि बलराम यांनी सांदीपनी ऋषींकडे गुरुगृही राहून शिक्षण घेतले होते.

**कार्य :-** कुरुक्षेत्र च्या युद्धात श्रीकृष्ण पांडवांच्या बाजूने लढले. महाभारतात म्हटले आहे की, श्रीकृष्णांच्या तेजाने जिंकला गेला नाही असा एकही राजा किंवा क्षत्रिय नाही. (म. भा. ३८.८.) हिंदू धर्मात श्रीकृष्ण यांना पूर्ण पुरुष मानले जाते. भारतीय जनमानसावर श्रीकृष्णांचा मोठा प्रभाव आहे. कृष्णलीला व कृष्णनीती असे शब्द त्यांच्यामुळे रूढ झाले. कृष्ण चरित्रानुसार श्रीकृष्णांचे मृत्युसमयी वय एकशेआठ वर्षे होते. महाभारत युद्ध संपल्यानंतर राजसूय यज्ञात पहिले मानकरी म्हणून श्रीकृष्णांची निवड झाली. भगवान श्रीकृष्ण हे एकमेव व्यक्ती होते ज्यांना भुतकाळ आणि भविष्यकाळ माहित होते तरी सुध्दा ते नेहमी वर्तमान क्षणी जगले. श्रीकृष्ण आणि त्यांचे जीवनचरित्र खरोखर प्रत्येक मनुष्यासाठी एक शिकवण आहे.

**गीता उपदेश :-** महाभारत युद्धाच्या सुरुवातीला अर्जुनास युद्धास प्रोत्साहित करण्यासाठी भगवान श्रीकृष्ण यांनी त्याला भगवद्गीता सांगितली. यात आत्म्याचे अविनाशी असण्याचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. मार्गशीर्ष शुक्ल एकादशी (मोक्षदा एकादशी) हा दिवस गीता जयंती म्हणून साजरा होतो. निष्काम बुद्धीने प्रयत्न, कष्ट, काम केले पाहिजे. मनुष्याला कर्मे सुटत नाही. ज्ञानी माणसालाही ती सुटत नाहीत. म्हणून प्रत्येकाने आपले कर्म केले पाहिजे. मात्र फळाची आशा न करता सतत चांगले कर्म म्हणजेच काम केले पाहिजे. समाजात राहताना लोकांच्या कल्याणासाठी काम केले पाहिजे. कामासाठी कोणतीही लाचलुचपत, भ्रष्टाचार न करता जीवनभर काम करा हाच संदेश गीतेने दिला आहे.

**श्रीकृष्णांच्या जीवनातून मिळणारी शिकवण**

कर्मयोग ही ईश्वराची पूजाच असते! कुठल्याही फलाची अपेक्षा न धरता निष्काम कर्म करणं हेच जीवन. भक्ती म्हणजे निस्वार्थ विश्वास, सेवा आणि पूजन. प्रेम म्हणजे कसलीही अपेक्षा न ठेवणार-निरपेक्ष आदरयुक्त आकर्षण. स्वतःतील तेजशक्तीचा शोध म्हणजे जीवन. तो शोध लावून घेण्याचा मार्ग म्हणजे समर्पित भक्तिभाव व निर्लोप प्रेम. ज्याला अंतरंग कळलं-त्याच्यातील सुष्ट-दुष्ट शक्ती कळल्या त्याला जीवन कळलं. प्रसंगी आपल्या प्राणप्रिय जन्मभूमीचाही त्याग करावा लागतो-कर्तव्याच्या पालनासाठी. वाढ आणि विकास हीच जीवनाची लक्षणे आहेत. वाढ म्हणजे आकाराची-बाहेरची-शरीराची वृद्धी. विकास म्हणजे संस्कारांनी घडवलेली मनाची वृद्धी. "कर्म कधीच हलकं किंवा मोठं नसतं. ते तसं बघणाऱ्याच्या हलक्या मोठ्या दृष्टीमुळं दिसतं." "मानवाची खरी संपत्ती आहे बुद्धिमत्ता. सुसंस्कारांनी पैलू पाडलेली निकोप बुद्धिमत्ता हेच खरे रत्न, तीच खरी संपत्ती आहे. तीच कणभर का होईना जीवन पुढे नेते. त्याचा विकास करते." गरिबी हा दोष नाही पण मनाची गरिबी मात्र अवश्य दोष आहे. "अहंकार, मग तो सत्ता संपत्ती, सौंदर्य, सामर्थ्य, ज्ञान कशाचाही असो मानवी जीवाची तो प्रचंड हानी करतो. कणभरही तो जीवाला काही पुढं जाऊ देत नाही." सर्वांहून ज्ञानाचा-अद्यात्मिक ज्ञानाचा अहंकार अधिक वाईट. कर्मयोग ही ईश्वराची पूजाच असते! कुठल्याही फलाची अपेक्षा न धरता निष्काम कर्म करणं हेच जीवन.

**अवतार समाप्ती :-**
महाभारतात श्रीकृष्णांच्या अवतार समाप्तीचे वर्णन आहे. त्यात ग्रहणांचे खगोलीय निरीक्षण आहे. त्यानुसार कृष्णांची अवतार समाप्ती इ. स. पू. ५५२५ या वर्षी झाला.

**यदा यदा हि धर्मस्य**
**ग्लानीर्भवति भारत।**
**अभ्युथानम् अधर्मस्य**
**तदात्मानं स्रुजाम्यहम् ।।**
**परित्राणाय साधुनाम**
**विनाशायच दुष्कृताम् ।।।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामी**
**युगे युगे।।।।**

**श्री कृष्ण गोविंद हरे मुरारी हे नाथ नारायण वासुदेवाय ...**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)